|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव- ४२५००१

## NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON- 425001

P.B.NO. 80, UMAVI NAGAR, JALGAON – 425 001 (M.S.)

Grade-B (2.88)
(NAAC Re-Accredited)

जाक्र.उमवि/5/टे.क्र.8/53/2013. दि.21/3/2013.

**प्रति,**
**उमवि संलग्नीत सर्व महाविद्यालयांचे**
**मा. प्राचार्य -------**

**विषय :-** स्थानिक तपासणी समितीचा अहवाल महाविद्यालयाने मागणी केल्यास आकारावयाच्या शुल्काबाबत.

**महोदय,**

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयांच्या संलग्नीकरणाच्या नुतनीकरणासाठी तसेच विस्तार/नैसर्गिक विस्तार/कायम संलग्नीकरणाच्या किंवा इतर शैक्षणिक कामांच्या निमित्ताने महाविद्यालयाच्या तपासणीसाठी विद्यापीठामार्फत विविध स्थानिक तपासणी समित्या नियुक्त करण्यात येतात.

सदरच्या स्थानिक तपासणी समित्या संबंधित महाविद्यालयांना भेटी देवून समितीचा अहवाल विद्यापीठास सादर करीत असतात. सदर अहवालाच्या अनुषंगाने संलग्नता विभागामार्फत अहवालातील अटी/त्रुटी/निरीक्षणे इ. बाबी संलग्नीकरणाचे नुतनीकरणाच्या पत्रासोबत तक्त्याच्या स्वरूपात किंवा यथावकाश त्या त्या संबंधित महाविद्यालयास माहिती तथा कार्यवाहीस्तव पाठविण्यात येत असतात.

तरीही काही महाविद्यालयांकडून पुढील शैक्षणिक वर्षासाठी किंवा त्यांचे कार्यालयीन रेकॉर्डसाठी स्थानिक तपासणी समितीच्या अहवालाची प्रत मागणी करण्यात येते. सदरच्या अहवालाच्या प्रतीची वाढती मागणी विचारात घेता व त्यासाठी लागणारा मनुष्यबळ, वेळ, स्टेशनरी, पोस्टेज खर्च इ. लक्षात घेता याबाबत प्राप्त आदेशान्वये कळविण्यांत येते की, सदर बाबीसाठी प्रति अहवाल रू. 300/- फी आकारण्यात येत आहे. याची कृपया नोंद घ्यावी.

आपला विश्वासू

(स.भा.सुरवाडे)
उपकुलसचिव(बी.सी.यु.डी.विभाग)